## <u>वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक १८ खालील आदेश</u>

## (पारीत दिनांक १८.११.२०२५)

## <u>**CNR No.MHLA**140023482025</u>

प्रस्तूतचा अर्ज वादींनी ***<u>दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७</u>*** अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२**. वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटणी करून वेगळा व स्वतंत्र ताबा मिळणेबाबत व दि. १८.०७.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र दस्त क्र. ४२५५/२०२५ हे वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत करून मिळणेबाबत दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी अनावधानाने व नजरचुकीने दाव्याचे पान क्र. ७ वर ओळ क्र. ३ मध्ये प्रतिवादी क्र. ५ असा मजकुर टंकलिखीत झालेला आहे तसेच नि.क्र. ५ वरील अर्जामध्ये पान क्र. ७ वर ओळ क्र. ४ मध्ये प्रतिवादी क्र. ५ असे चुकीने टंकलिखीत झाले आहे त्यामुळे त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कसल्याही प्रकारचा बदल होणार नाही. सबब प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०३**. प्रतिवादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करून योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

**०४**. अभिलेखाचे अवलोकन केले. वादींचा व प्रतिवादीचा युक्तिवाद ऐकला.

**०५**. वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटणी करून वेगळा व स्वतंत्र ताबा मिळणेबाबत व दि. १८.०७.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र दस्त क्र. ४२५५/२०२५ हे वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत करून मिळणेबाबत दाखल केलेला आहे. वादीने वादपत्रामध्ये तसेच नि.क्र. ५ मध्ये प्रास्ताविक दुरुस्ती करणेसाठी मागणी केलेली आहे. सदर दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचे स्वरुप

बदलणार नाही म्हणून, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेशः–

# आदेश

१. वादींचा अर्ज **नि.क्र.१८** मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी वादपत्रात प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन पुढील तारखेला किंवा त्या अगोदर करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.11.19 17:09:58 +0530

**(श्रीमती एस. डी. साबळे)**

दिनांकः– १८.११.२०२५. २रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.
ठिकाण – औसा. जिल्हा लातूर.